११) शेतातील मुंग्यांची वारूळे शोधुन त्यात क्लोरोपायरीफॉस २० टक्के ई.सी.चे प्रभावी मिश्रण (२५ मि.ली/१० लि. पाणी) ओतुन मुंग्यांचा नाश करावा.

१२) प्रजातीनुसार जमिनीत अंडी देणा-या किडीच्या नियंत्रणासाठी पाण्यातुन क्लोरोपायरीफॉस २० ई.सी. २ लि. प्रति हेक्टर प्रमाण द्यावे.

१३) शेतात नियमीतपणे पीक निरिक्षण करावे. एक दोन झाडांवर किडीचा उपद्रव आढळल्यास उपद्रवीत भागांचा तोडुन नाश करावा. संपुर्ण झाड उखडले असल्यास तेथे जमिनीत मिथाईल पेराथियोन २ टक्के भुकटी धुरळावी.

१४) हया किडीचा प्रसार विविध शेती औजारांद्वारे सुध्दा होतो. त्यामुळे प्रादुर्भावग्रस्त शेतातुन अशी औजारे नेताना व्यवस्थीत स्वच्छ करावीत.

१५) हया किडीवर अनेक परजीवी व परभक्षी किटक आढळुन येतात, जे नैसर्गिकरीत्या किडीच्या वस्तीचे नियंत्रण करतात. अशा मित्र किडींची संख्या योग्य प्रमाणात असताना रासायनिक औषधांचा वापर टाळावा.

१६) हवेत आद्रतेचे योग्य प्रमाण (६० ते ७० टक्के) असताना व्हर्टिसीलीयम लेकानी हे जैविक किडनाशक १०० लि. पाण्यात ४०० ग्रॅम हया प्रमाणात १ लि. दुध मिसळुन सायंकाळी फवारावे व शेतात भरपुर पाणी द्यावे.

१७) किडीचा उपद्रव जास्त प्रमाणात आढळुन आल्यास खालील पैकी कोणत्याही एका किटकनाशकाचा वापर फवारणीसाठी करावा. ईमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के एस.एल.-६ मि.ली/१० लि. पाणी किंवा ॲसिफेट ७५ टक्के एस.पी.- २० ग्रॅम/१० लि. पाणी किंवा प्रोफेनोफॉस ५० टक्के ई.सी- २० मिली/१० लि. पाणी किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के ई.सी-१५ मिली/१० लि. पाणी किंवा थायोडीकार्य ७५ टक्के वे. पा- १५ ग्रॅम/१० लि. पाणी किंवा क्विनॉल्फॉस २५ टक्के ई. सी- २० मिली/१० लि. पाणी अशा १० लि. च्या मिश्रणात १० ग्रॅम डिटरजंट पाऊडर टाकल्यास योग्य व त्वरीत नियंत्रण मिळते. कोणत्याही एकाच किटकनाशकाचा वापर पुन्हा पुन्हा करू नये, त्यामुळे किडीची प्रतिकारक क्षमता वाढते.

पिठया ढेकूण प्रार्दुभावामुळे झालेले विविध पिकांचे नुकसान

सिताफळ

आंबा

पेरु

डळिंब

पपई

द्राक्ष

भेंडी

संत्र


कापुस

गाजर गवत (कॉग्रेस)

लेख संकलन

डॉ. मिलिंद डी. जोशी
विषय विशेषज्ञ (पीक संरक्षण),
कृषि विज्ञान केंद्र, बारामती

डॉ. सय्यद शाकीर अली
प्रमुख व वरिष्ठ शात्रज्ञ,
कृषि विज्ञान केंद्र, बारामती

Agricultural Development Trust Baramati

पिठया ढेकूण

(मिलीबग)

ओळख व व्यवस्थापन

निर्मिती:

प्रकल्प संचालक आत्मा, पुणे

कृषि भवन, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५
फोन – ०२०–२५५३०४३१
E-mail : pdatmapune@gmail.com

तांत्रिक मार्गदर्शन:

कृषि विज्ञान केंद्र बारामती

पिठ्या ढेकुण (मिलीबग) ओळख व व्यवस्थापन

पिठ्या ढेकुण (मिलीबग) ही एक मुख्य रस शोषक कीड आहे. ह्या किडीचा उपद्रव अनेक वनस्पतींवर आढळुन येतो. हया किडीच्या अनेक प्रजाती जगभर पिकांना नुकसान करतात. त्यापैकी फेरीसीया विरगाटा, फेनाफोकस सोलेनोप्सीस, मेकोनेलीकोकस हिरसुटस, स्युडोकोकस, लॉन्जीरयीनस इ. प्रजाती महाराष्ट्रात आढळुन येतात. महाराष्ट्रात ह्या किडीचा उपद्रव विशेषतः कापूस, ऊस, तंबाखु, तुर, वांगी, टोमॅटो, फळझाडे (आंबा, आवळा, सीताफळ, पेरू, केळी व डाळींब), वेलवर्गीय भाजीपाला आणि सुशोभनाची फुलझाडे (जास्वंद, क्रोटोन, झेंडु) इ. पिकांवर आढळतो. तसेच काही प्रजाती तणांवर सुध्दा गुजराण करतात.

ओळख-

प्रजातीनुसार हया किडीचा बाहय देखाव थोडाफार बदलतो. सामान्यतः किडीची पिल्ले (क्राऊलर्स) आकाराने लंबगोल व रंगाने पिवळट किंवा सफेद किंवा गुलाबी असतात. पिल्ले चपळ असुन पानावर फिरताना आढळतात. प्रौढ मादी किटकाला पंख नसतात तर नराला एक जोडी पंख असतात. नर आकाराने लांबट असुन शेवटी दोन शेपटीसारखे भाग दिसतात. मादी कीटक व पिल्लांच्या शरीरावर सफेद मेणासारखे चिकट आवरण आढळुन येते .

नुकसान-

सामान्यतः हया किडीमुळे शेतीपिकांना खुप नुकसान होत नाही. परंतु वातावरणातील घटक किडींच्या वाढ व प्रादुर्भावासाठी अनुकुल झाल्यास किडींची संख्या वाढते व प्रादुर्भाव वाढल्याने जास्त प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता असते.

हया किडीचा उपद्रव मुख्यत्वे माल्वेसी, सोलनासी आणि लेग्युमिनासी हया कुटुंबातील पिकांवर आढळतो. हया किडींची पिल्ले व प्रौढ (मादा) अशा दोन्ही अवस्था यजमान वनस्पतींचा कोवळा भाग (शेंडा, पान, कळी, फुल, बोंड, फळ) मधुन रस शोषुन नुकसान करतात. खोडातुन रस शोषल्याने खोड कमजोर पडते. कवळी पाने न फुलांमध्ये प्रादुर्भाव झाल्यास पुर्ण झाड वाळते. आंबा व सिताफळासारख्या फळांमध्ये ह्या किडींने फळांची गुणवत्ता कमी होते.

आंब्यात प्रामुख्याने देठाजवळ किडींचा प्रादुर्भाव दिसुन येतो तर सिताफळामध्ये हि किड खोडातुन व फळातुन रस शोषन करते. ऊसामध्ये ही किड खोडातुनच रस शोषन करते, ज्याने साखरेचे प्रमाण कमी होते.

हया किडींच्या शरीरातुन व रस शोषन केल्यामुळे पानातुन चिकट मधासारखा पदार्थ बाहेर पडतो. त्यावर बुरशीचा विकास होवुन झाड काळवंडते. यामुळे झाडाच्या प्रकाश संश्लेषण क्रियेत अवरोध निर्माण होतो व झाडाची वाढ खुटते. हया पदार्थावर आवर्जुन मुंग्यांची संख्या वाढते व हया किडीला एका झाडावरून दुस-या झाडावर पसरण्यात मदत होते.

जीवनक्रम

अंडी

पिल्ले (क्राऊलर्स)

प्रौढ

हया किडीमध्ये असंयोगी (नराबरोबर समागम न करता) प्रजनन होते. मादा किटक तिच्या आयुष्यात जवळजवळ १५० ते ४०० अंडी एका कापसाप्रमाणे दिसणा-या नाजुक पिशवीत (ओविसेक) देते. अंडी पिवळट व सफेद असतात.

हया किडीच्या काही प्रजाती यजमान पिकाच्या पानाच्या खालच्या बाजुस अंडी देतात. तर काही जमिनीत अंडी घालतात. अंडी ज्या त्या विस्तारातील वातावरणानुसार ३ ते ६ दिवसात उबतात व त्यातुन लहान पिल्ले (क्राऊलर्स) बाहेर येतात. पिल्ले अवस्था २० ते २५ दिवसांची असते. मादा किटकांच्या वाढीच्या तीन अवस्था असतात तर नर चार अवस्थांतुन वाढ पुर्ण करतो. मादा किटक २५ ते ३० दिवस जगते. प्रतिकुल हवामानात ही किड अंडी अवस्थेत जमिनीत सुप्तावस्थेत जाते.

नियंत्रण-

ही एक बहुभक्षी किड असल्याने अनेक पिकांवर हया किडीचा उपद्रव आढळतो. तसेच, किडीचा जीवनक्रमसुध्दा विशिष्ट आहे. हया गोष्टी लक्षात ठेवुन ज्या त्या पिकांनुसारच नियंत्रणाचे उपाय योजावेत. तसेच फक्त एकाच नियंत्रण पध्दतीचा अवलंब न करता एकात्मिक किड नियंत्रणावर भर द्यावा, जेणेकरून किडीचे योग्य व त्वरीत नियंत्रण होईल.

१) ऊन्हाळ्यात खोलवर नांगरणी केल्याने जमिन तापुन त्यामध्ये सुप्तावस्थेत असलेल्या विविध किडींच्या अवस्थांचा नाश होतो.

२) जर शेतात पुर्वीच्या हंगामात हया किडीचा उपद्रव असेल तर हयावेळी शेतात पेरणीच्या आगोदर मिथाईल पेराथियोन २ टक्के भुकटी (२० ते २५ किलो प्रति हेक्टरी) धुरळावी.

३) शक्य असल्यास किड प्रतिकारक जातींची निवड करावी.

४) ऊसात प्रादुर्भावग्रस्त बेणे वापरल्याने किडीचा उपद्रव वाढतो, त्यासाठी ऊस लागवडीपुर्वी बेण्याला मेलाथियोन (५० मि.ली/१० लि. पाणी) बेणे प्रक्रीयेसाठी वापरावे.

५) ऊसातील खोड किडीच्या नियंत्रणासाठी वापरल्या जाणा-या कार्बोफ्युरॉन ३ टक्के दाणेदार औषधाने सुध्दा हया किडीचे नियंत्रण होते.

६) ही किड अनेक तणांवर गुजराण करते. त्यासाठी शेतातुन व बांधावर अशा तणांचा बंदोबस्त करावा.

७) आंब्याच्या बागेत झाडांच्या खोडाजवळील जमिनीत खड्डा केल्याने तेथील किडींच्या अंडी व पिल्ले या अवस्थांचा नाश होतो.

८) शेतात पिकांनुसार योग्य व वेळोवेळी मशागतीय कामे केल्यास जमिनीतील किडींच्या अवस्थांचा नाश होतो.

९) डिसेंबर-जानेवारी महिन्यात फळझाडाच्या खोडाजवळ मिथाईल पेराथियोन २ टक्के भुकटी धुरळावी (२५ ग्रॅम प्रति झाड).

१०) झाडाला जमिनीपासुन २ ते ३ फुट उंचीपर्यंत ग्रीस किंवा चिकट पदार्थ किंवा पोलिथीनचा ३० ते ५० से.मी चा पट्टा बणविल्यास किडीच्या पिल्लांना झाडावर चढणे शक्य होत नाही.